दूरध्वनीक्रमांक:
०२०२५६२१४४०

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)

परीक्षा समन्वय कक्ष
गणेशखिंड, पुणे –०७

website : www.unipune.ac.in

e-mail : ar.coordination@pun.unipune.ac.in
sssapp-coord@pun.unipune.ac.in

संदर्भ: परीक्षा समन्वय/ ५१२ दिनांक: २०/०९/२०२४

03/10/2024

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यता प्राप्त संस्था,
अहमदनगर, नाशिक व पुणे,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे – ४११००७

विषय :– बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक/भरारी पथक जबाबदारीकरिता कार्यमुक्त करणेबाबत...

महोदय/महोदया,

वरील विषयी कळविण्यात येते की, सन २०२४ हिवाळी सत्राच्या परीक्षांचे आयोजन २२ ऑक्टोबर २०२४ पासुन करण्यात येत असुन या परीक्षा केंद्रावर विद्यापीठाकडून बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षकांची नेमणूक केली जात आहे.

बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक/भरारी पथक सदस्य म्हणून नेमणूक करण्यासाठी सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थाकडून त्यांच्या महाविद्यालयातील काही शिक्षकांची नावे मागविण्यात आलेली आहेत. परंतु असे निदर्शनास आले आहे की, विद्यापीठाने नियुक्त केलेले बरेच बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक त्यांना नेमून दिलेल्या परीक्षा केंद्रावर काही कारणामुळे हजर होत नाहीत.

**महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनीयम, २०१६ कलम ४८ (४) ची तरतूद खालीलप्रमाणे आहे.**
"विद्यापीठ, संलग्न, संचलित महाविद्यालये, समूह महाविद्यालये किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या प्रत्येक अध्यापकावर आणि अध्यापकेतर कर्मचा–यावर, विद्यापीठाच्या परीक्षा व विद्यार्थ्यांचे मूल्यमापन याबाबत परिनियमाद्वारे विहित केल्याप्रमाणे आवश्यक ते सहाय्य आणि सेवा देणे बंधनकारक असेल. याबाबत विद्यापीठाच्या किंवा महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या आदेशाचे अनुपालन करण्यात कोणत्याही अध्यापकाने किंवा अध्यापकेतर कर्मचा–याने कसूर केल्यास, ती गैरवर्तणूक असल्याचे समजण्यात येईल आणि तो कर्मचारी शिस्तभंगविषयक कारवाईसाठी पात्र असेल. याबाबत विद्यापीठाच्या आदेशाचे अनुपालन करण्यात, कोणत्याही संलग्न महाविद्यालयाच्या, संचालित महाविद्यालयाच्या, समूह महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या अध्यापकाच्या किंवा अध्यापकेतर कर्मचा–याच्या वतीने कसूर झाल्यास, मा. कुलगुरूस, त्यांच्याविरुद्ध, समुचित कारवाई करण्याचा अधिकार असेल, यामध्ये परिनियमांद्वारे विहित करण्यात आले असेल त्याप्रमाणे, अध्यापकाच्या नियुक्तीच्या मान्यतेस स्थगिती देण्यासह शास्ती लादण्याचा समावेश असूशकेल."

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमाची वरील तरतूद लक्षात घेता सर्व घटकांनी परीक्षेसंदर्भात त्यांच्यावर सोपवलेली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडणे अपेक्षित व आवश्यक आहे.

तरी आपल्या महाविद्यालयातील ज्या शिक्षकाची विद्यापीठाकडून बहि:स्थ पर्यवेक्षक/दक्षतापथक सदस्य म्हणून नेमणूक करण्यात येईल, त्यांना संबंधित जबाबदारी पूर्ण करणेकरिता तातडीने आपल्या महाविद्यालय/मान्यताप्राप्त संस्थेतून नेमणूकीच्या कालावधीसाठी कार्यमुक्त करावे.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ